दे धक्का!!

सुराज्य सोलापूर

शनिवार, दि. २० एप्रिल २०२४ । पान १२

देशमुख गटाच्या शांततेची अक्कलकोटमध्ये चर्चा!

अक्कलकोट : सोलापूर लोकसभा निवडणुकीत काँग्रेसच्या उमेदवार आमदार प्रणिती शिंदे व भाजपचे उमेदवार आमदार राम सातपुते या दोघांसाठी अक्कलकोट विधानसभा मतदार संघ महत्त्वाचा असून या मतदारसंघातील लीड निर्णायक ठरणार आहे. या लीड मधून विधानसभेची गणिते ठरणार असल्याने प्रचाराचा जोर वाढला आहे. दोन्ही उमेदवारांची प्रचाराची पहिली फेरी संपली तरी काँग्रेस व भाजप दोन्ही पक्षातील अनेक मातब्बर पुढारी मात्र अद्याप शांत दिसत असून प्रचारात सक्रीय न होता बघ्याची भूमिका ते घेत असल्याचे दिसत आहे. यामुळे राजकीय विश्लेषकांना हवा कोणाची सांगणे शिवाय अचूक गणित मांडणे सध्या तरी अवघड बनले आहे. दोन्ही सेनापतींची कसोटी पणाला लागत असली तरी काही सैनिक मात्र अद्यापही प्रचारात सक्रिय झालेले दिसत नाहीत.

मिथिलेश जोशी
सोलापूर

पूर्वी अक्कलकोट विधानसभा काँग्रेसचा बालेकिल्ला समजला जात होता. २००९ पासून हा बालेकिल्ला हळूहळू डळमळीत झाला. सध्या भारतीय जनता पक्षाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी असून यांनी पुढील काही वर्षाची राजकीय पेरणी चांगलीच करून ठेवली आहे. माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे हे सुद्धा मागे नाहीत. तेदेखील रात्रंदिवस जिद्दीने मेहनत घेत आहेत. सोलापूर लोकसभा मतदार संघात सहा तालुके येत असले तरी विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी आपले पूर्वीचे मताधिक्य कायम ठेवण्यासाठी जोर लावत असले तरी काँग्रेसवाले मात्र भाजपचे मताधिक्य कमी करून लेव्हल करण्यासाठी जोर लावत आहेत. दोन्ही पक्षाला गावभेट दौऱ्यात गर्दी मात्र समसमान दिसत असल्याने मतदारांच्या मनातील कौल यंदा कळेनासा झाला आहे. प्रत्येक निवडणुकीत विजय संपादन करायचं; असल्यास अंतर्गत हेवेदावे बाजूला सारून जूने, नवे पदाधिकारी,कार्यकर्ते एकमुखीने ताकद लावून झटल्यास विजय दूर नसतो. काँग्रेसचे माजी पं.स.चे माजी सभापती व मुस्लिम समाजाचे चेहरा असलेले महिबूब मुल्ला पक्ष सोडून भाजपात गेले तर वकील बागवान प्रचारात दिसेनासे झाले आहे.

मुस्लिम समाजाचे मातब्बर नेत्यापैकी एकमेव माजी नगरसेवक अशपाक बळोरगी यांच्यावर काँग्रेसची भीस्त आहे. धनगर समाजाचे नेते माजी सभापती महेश जानकर, मराठा समाजाचे नेते विलास गव्हाणे, माजी सभापती विमल गव्हाणे यांनी सुद्धा काँग्रेस सोडून भाजपात प्रवेश केला असून यांची उणीव भरून काढणे पक्ष नेतृत्वासमोर मोठं आव्हान असणार आहे. बंजारा समाजाचे नेते माजी पं स सदस्य मोतीराम राठोड यांनी तर यापूर्वीच काँग्रेस पक्षाला रामराम ठोकला आहे. माजी नगराध्यक्षा महानंदा स्वामी, शिवराज स्वामी हे अजित पवार गटाने भाजप प्रणित झाले आहेत. नगरसेवक महेश इंगळे, अभय खोबरे,माजी उपसभापती रामचंद्र अरवत, माजी नगराध्यक्षा डॉ.सुवर्णा मलगोंडा, सुनील गोरे, प्रशांत लोकापुरे, लाला राठोड, माजी नगरसेवक श्रीशैल अल्लोळी या पदाधिकाऱ्यांपैकी बरेचजण अद्याप फिरकले नसून काही जण सोईने हजेरी लावत आहेत.

भाजपाचे खा.डॉ जयसिद्धेश्वर महास्वामीजीं अद्याप एकही बैठकीत, प्रचारात दिसले नसून त्यांना बोलावले नाही की ते स्वतः हुन येण्याला टाळत आहेत अशी चर्चा सुरू आहे. रिपाइंचे तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे अद्याप एकही बैठकीला गेले नसून रासपचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सुनील बंडगर यांनी यापूर्वीच सोशल मीडियावर नाराजी व्यक्त करून प्रचार पासून दूर राहणे पसंत केले आहे. राष्ट्रवादी अजित पवार गटाचे तालुका अध्यक्ष दिलीप सिद्धे, शिवसेना शिंदे गटाचे संजय देशमुख हे अधूनमधून हजेरी लावत आहेत. भारतीय जनता पक्षाचे माजी तालुका अध्यक्ष मल्लिनाथ स्वामी, राजशेखर मसूती असे काही जुने चेहरे पक्ष हित म्हणून सोबत राहणे आवश्यक असते. तेही अद्याप प्रचारात सक्रिय झालेले दिसत नाहीत.

आमदार विजयकुमार देशमुख गटाचे काय?

आमदार विजयकुमार देशमुख यांचा अक्कलकोट येथील गट शांत असल्याचे जाणवत असून तशी चर्चादेखील भाजपच्याच गोटात रंगली आहे. या गटाचे माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी, माजी जि. प. सदस्य आनंद तानवडे, बाळासाहेब मोरे, रेवणसिद्ध बिराजदार असे अनेकांचे निर्णय काय असणार? अशी चर्चा सध्या तरी सुरू आहे.

महायुतीसाठी बार्शीचे आव्हान!

धाराशिव लोकसभेच्या मतदार संघात निवडणूक लक्षवेधी ठरत आहे. या मतदार संघात समाविष्ट असलेल्या बार्शी तालुक्याचे महत्त्व देखील या निवडणुकीत असणार आहे. या तालुक्यात राष्ट्रीय नेते शरद पवार यांचाही प्रभाव राहिला आहे. त्यांच्याशी थेट संबंधात असणाऱ्या व्यक्तिचीही मोठी संख्या बार्शीत आहे. या तालुक्याच्या राजकारणात राष्ट्रवादी व शिवसेना या दोन पक्षांनाच जनतेने वारंवार पसंती दिली आहे. गेली २५ वर्षे बार्शी तालुक्यातील राजकारणात प्रभावी स्थान निर्माण करणाऱ्या आमदार राऊत यांनी भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून तालुक्यात आपले साम्राज्य प्रस्थापित केले असले तरी त्यांच्यासाठी महायुतीच्या उमेदवार अर्चना पाटील यांची उमेदवारी जनसामान्यांपर्यंत पोचविणे आणि मोठे मताधिक्य मिळवून देणे हे आव्हानच आहे.

सचिन अपसिंगकर
बार्शी

धाराशिव जिल्ह्यात माजी कॅबिनेटमंत्री डॉ.पद्मसिंह पाटील हे गेली पन्नास वर्षे राजकारणात सक्रीय आहेत. राज्याच्या राजकारणातही ते मोठे प्रस्थ समजले जातात. त्यांचा राजकीय वारसा त्यांचे सुपुत्र आणि तुळजापूरचे विद्यमान भाजप आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पुढे नेला आहे. शरद पवारांचे उजवे हात समजले जाणारे डॉ. पाटील यांचे पुत्र राणाजगजितसिंह पाटील हे भाजपमध्ये जातील आणि नंतर राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाकडे वळतील, हा जिल्ह्याच्या राजकारणात मोठा भूकंपच मानला जातो. बार्शी विधानसभा मतदारसंघाशी डॉ.पाटील हे गेली अनेक वर्षे राष्ट्रवादीच्या राजकारणामुळे व नंतर खासदार झाल्यामुळे संर्पकात राहिले.

पण गेल्या पाच वर्षात लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर राणाजगतसिंह पाटलांनी बार्शीकडे पाठ फिरवली. नंतर यथावकाश त्यांच्या पत्नी सौ. अर्चना पाटील यांना धाराशीव लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी जाहीर झाली पण गेल्या पाच वर्षात बार्शीबरोबर असलेल्या जनसंपर्काच्या अभावामुळे त्यांचा कसा निभाव लागणार असा प्रश्न आहे. सध्या बार्शीत आमदार राजेंद्र राऊत हे प्रबळ नेते आहेत. गेल्या २५ वर्षामध्येतालुक्याच्या राजकारणातील महत्वाची सत्ताकेंद्र क्रमाक्रमाने आली. राऊत गटाने वेगवेगळ्या पक्षात असतानाही दोन वेळा बार्शीचे नगराध्यक्षपद आणि नगरपालिकेची सत्ता पटकावली. नंतर पंचायत समिती सत्ता त्यांच्या ताब्यात चार वेळा आली. जिल्हा परिषदेतही त्यांना मानणारे सदस्य चांगल्या संख्येने निवडून गेले. बाजार समितीची सत्ताही त्यांनी मिळवली.

राऊत यांनी दोन वेळा आमदारकी पटकावली. २०१९ साली राऊत हे अपक्ष आमदार म्हणून निवडून आल्यानंतर भाजपशी एकनिष्ठ राहिले. विधीमंडळातही त्यांनी भाजपचीच पाठराखण केली. शिवसेना व राष्ट्रवादीत झालेल्या बंडानंतर भाजपा राज्याचा केंद्रबिंद झाला आणि राज्यातील सत्तेचा रिमोट कंट्रोल देवेंद्र फडणवीस यांच्या हातामध्ये आला. त्यानंतर आमदार राऊत यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून तालुक्यासाठी मोठा विकास निधी मिळवला.तालुका उपसा सिंचन योजनेसाठी साडेसहाशे कोटी रूपयांचा निधी मंजूर करून घेतला. तालुक्यातील पन्नास हजार एकर जमीन बारमाही ओलिताखाली आणण्याची घोषणा केली असून ते सातत्याने फडणवीस यांचा वरदहस्त असल्याचे सिद्ध करत आहेत. पण आता त्यांच्या समोर लोकसभा निवडणुकीतमहायुतीचे उमेदवार अर्चना पाटील यांना आघाडी मिळवून देण्याचे आव्हान आहे.

ओमराजेंचा संपर्क

बार्शी तालुक्यात लोकसभेची निवडणूकसुद्धा प्रामुख्याने राऊत विरुद्ध सोपल अशा पारंपारिक लढतीप्रमाणेच होणार असली तरी विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांनी गेल्या पाच वर्षात बारमाही बार्शीकरांशी ठेवलेला संर्पक हे त्यांचे मोठे बलस्थान आहे. खासदार निंबाळकर हे गेल्या पाच वर्षात बार्शी तालुक्यात सतत विविध खासगी व सार्वजनिक कार्यक्रमांच्या माध्यमातून झळकत राहिले आहेत. त्याचप्रमाणे अतिवृष्टी असो वा अन्य नैसर्गिक आपत्ती असो निंबाळकर यांनी बार्शी तालुक्यात अनेक पाहणी दौरे केले आहेत. ग्रामीण भागात असलेल्या त्यांच्या थेट संर्पकामुळे त्यांना मानणारा मोठा वर्ग बार्शी तालुक्यात निर्माण झाला आहे. त्यांचा हा संपर्क त्यांच्या या निवडणुकीसाठी फळाला येऊ शकतो.

भालके, एमआयएममुळे काँग्रेस खुशीत

अजित उंब्रजकर
सोलापूर

सलग दोन वेळा झालेल्या पराभवाचा बदला घेण्यासाठी काँग्रेसने आता जोमाने तयारी सुरू केली आहे. पंढरपूरचे नेते स्वर्गीय आमदार भारत भालके यांचे चिरंजीव भगीरथ भालके यांची एन्ट्री आणि एमआयएमने घेतलेली माघार या दोन्ही गोष्टी आता काँग्रेसच्या पथ्यावर पडल्या आहेत. परिणामी काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला आहे. तर दुसरीकडे भाजपला आता आपली रणनीति बदलावी लागणार आहे.

आमदार प्रणिती शिंदे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या दिवशी काँग्रेसच्या बाजूने दोन जमेच्या गोष्टी घडल्या. सुरुवातीला अर्ज भरताना पंढरपूरचे नेते भगीरथ भालके यांनी आमदार प्रणिती शिंदे यांना पाठिंबा दिला तर त्यात सायंकाळी एमआयएमच्या शहराध्यक्ष फारुख शाब्दी यांनी लोकसभा निवडणुकीत आपला उमेदवार उभा करणार नसल्याची घोषणा केली. या दोन्ही गोष्टी काँग्रेससाठी सकारात्मक झाल्याचं मानलं जात आहे.

गेल्या लोकसभा निवडणुकीत पंढरपूरमधून आमदार भारत भालके हे सुशीलकुमार शिंदे यांच्या पाठीमागे ठामपणे उभे होते. त्यामुळे पंढरपूरमधून काँग्रेसला आघाडी मिळाली होती. मात्र त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांचे पुत्र भगीरथ भालके यांनी सुरुवातीला राष्ट्रवादी नंतर बीआरएस पक्षाची वाट धरली. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत काँग्रेसला पंढरपूरमधून मताधिक्य मिळणार की नाही याची चिंता लागली होती. अशातच आता भगीरथ भालके यांनी काँग्रेसला पाठिंबा दिल्यामुळे काँग्रेसला दिलासा मिळाला आहे.

भारत भालके यांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत भगीरथ भालके यांनी एक लाखांपेक्षा जास्त मते मिळाली होती. विरोधात आमदार समाधान आवताडे होते. त्यांना प्रशांत परिचारक यांची साथ होती. तरीही भगीरथ भालके यांचा निसटता पराभव झाला होता. त्यामुळे आता पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात काँग्रेसला परिचारक आणि अवताडे यांच्या जोडीचा जोडी स्टार नेता मिळाल्याचे बोलले जात आहे दुसरीकडे अचानकपणे एमआयएमने ही लोकसभा निवडणुकीतून माघार घेतल्यामुळे काँग्रेसला दुसरा दिलासा मिळाला आहे. पूर्वी मुस्लिम समाज हा काँग्रेसचा पारंपरिक मतदार होता. मात्र एमआयएमच्या राजकारणातील एंट्रीमुळे त्यामध्ये विभाजन झाले. याचा फटका प्रत्येकवेळी काँग्रेसला बसला आहे. सोलापूर शहर मध्य मतदरसंघात एमआयएमची ताकद मोठ्या प्रमाणात आहे. आता एमआयएमने उमेदवार न देण्याचा निर्णय घेतल्यामुळे मुस्लिम समाजाची मते काँग्रेसला मिळणार असल्याची शक्यता आहे.

घटक पक्षांची मोळी बांधण्याचे भाजपासमोर आव्हान!

माढा लोकसभा मतदारसंघात निवडणुकीचे धुमशान सुरु आहे. रणजितसिंह नाईक-निंबाळकर, धैर्यशील मोहिते-पाटील, रमेश बारसकर, लक्ष्मण हाके यांच्यामध्ये चौरंगी लढत होईल असे चित्र आहे. प्रत्येक उमेदवाराने आपली प्रचार यंत्रणा कार्यरत केली असून मतदान करण्याच्या पार्श्वभूमीवर, आपली भूमिका मतदारांपर्यंत पोचविण्याचा प्रयत्न सुरु आहे. दरम्यान, विद्यमान खासदार आणि महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकरांचीदेखील दुसऱ्यांदा विजय मिळविण्यासाठी शिकस्त चालू आहे. तथापि, महायुतीचे घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, आरपीआय रामदास आठवले गट, राष्ट्रीय समाज पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, सदाभाऊ खोत यांची रयत क्रांती संघटना या सर्वांना एकत्रित करुन जर ही निवडणूक लढली गेली तर महायुतीच्या उमेदवाराच्या विजयाचा मार्ग सुकर होऊ शकतो असे मानले जाते.

संजय पाटील
पिलीव

माढा लोकसभेच्या या खेपेच्या निवडणुकीत कमालीची चुरस पाहावयास मिळत आहे. भाजपने पुन्हा विद्यमान खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना उमेदवारी दिली आहे. तर त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटानं धैर्यशील मोहिते-पाटील यांना उमेदवारी दिली आहे. त्यातच वंचितचे रमेश बारसकर व ओबीसी मोर्चा पक्षाच्या वतीने प्रा. लक्ष्मण हाके हेही रिंगणात उतरले आहेत. यंदा बऱ्याच घडामोडी दिवसेदिवस घडत आहेत. गेल्या निवडणुकीत माळशिरस तालुक्याने जवळपास एक लाख सहा हजार मताधिक्य विजयी उमेदवारास दिले होते. पण या खेपेची परिस्थिती वेगळीच आहे. मोहिते-पाटील व कट्टर विरोधक उत्तम जानकर हेच एकत्र आल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. यामुळे महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांना माळशिरस तालुक्यात कसरत करावी लागेल असे दिसते. महायुतीचे उमेदवार खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांनी छोट्या छोट्या घटक पक्षांची जर मोट एकत्र बांधली तर माढा लोकसभा मतदारसंघात भाजपला अनुकूलता मिळेल असा अंदाज राजकीय जाणकारांचा आहे.

गेल्या निवडणुकीत विरोधात असणारे माढ्याचे आमदार बबनराव शिंदे व करमाळ्याचे आमदार संजय शिंदे हेही यावेळेस भाजपबरोबर आहेत. त्यामुळे भाजपने सर्व घटक पक्षांना एकत्र आणणे महत्वाचे आहे. सध्या त्यांचे महायुतीतील घटक पक्ष प्रचारात सक्रिय दिसत नाहीत पण या सर्वच पक्षाची माढा लोकसभा मतदारसंघात चांगलीच ताकद आहे हे विसरून चालणार नाही.

घटक पक्षांची प्रचार यंत्रणा एकत्रित गरजेची

राष्ट्रीय समाज पक्षाचे संस्थापक महादेव जानकर यांना भाजपने म्हणजेच महायुतीने उमेदवारी दिली आहे. यामुळे सध्या धनगर समाजात आनंदाचे वातावरण आहे. कारण आजवर कोणत्याही पक्षाने धनगर समाजाला लोकसभेची उमेदवारी दिली नव्हती. माढा लोकसभा मतदारसंघात धनगर समाजाची मते सगळ्यात जास्त आहेत. तर रामदास आठवले यांना मानणारा वर्ग माढा लोकसभा मतदारसंघात मोठा आहे. तर रयत क्रांती संघटनेचे सदाभाऊ खोत यांनी २०१४ हया वर्षी या मतदारसंघातून लोकसभा निवडणूक लढविली होती त्यांना मानणारा मोठा मतदार वर्ग याठिकाणी आहे. भाजपने सर्व घटक पक्षांना एकत्र आणून निवडणूक लढविल्यास भाजपची या ठिकाणची अडचण कमी होऊ शकते.

मोहिते-पाटील, जानकरांना शह देण्याचा प्लॅन! तिसऱ्या आघाडीला मिळणार भाजपाची रसद!

सोलापूर : मोहिते-पाटील आणि जानकर हे पारंपारिक विरोधक एकत्र आल्याने या दोन्ही गटातील नाराज झालेले असंतुष्ट, मूळचे भाजपातील नेते, प्रमुख कार्यकर्ते अशांची एक 'तिसरी आघाडी' उदयास येत असून या आघाडीच्या माध्यमातून मोहिते-पाटील आणि जानकर यांना शह देण्यासाठी मोठी 'रसद' भाजपाकडून पुरवली जाणार असल्याची आणि त्याबाबतच्या गुप्त बैठका सुरु झाल्याची विश्वसनीय माहिती 'सुराज्य'च्या हाती लागली आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे तिसरी आघाडी स्थापन करण्याच्या पार्श्वभूमीवर, सगळी तयारी झाल्यानंतर हा प्रस्ताव भाजपच्या वरिष्ठ नेतेमंडळींकडे नेला जाणार आहे. तथापि असं असलं तरी भाजपला डावलून राष्ट्रवादी शरदचंद्र पवार (तुतारी) गटात जाणाऱ्या मोहिते-पाटील आणि जानकरांच्या विरोधात एकत्र या आम्ही पाठबळ देऊ, असा शब्द भाजप नेतेमंडळींकडून देण्यात आल्याचंदेखील सांगण्यात आलं. येत्या काही दिवसात तिसऱ्या आघाडीच्या स्थापनेच्या तुताऱ्या या तालुक्यात वाजू शकतात.

उत्तम जानकर गटासोबत का जमवून घेतलं? यावरुन नाराज झालेले मोहिते-पाटील गटातील असंतुष्ट तसेच मोहिते-पाटील यांच्याशी जुळवून घेतल्याचा निर्णय मान्य न झालेले जानकर गटामधील संबंधित नाराज आणि मुळचे भाजपमधील नेते, पुढारी, प्रमुख कार्यकर्ते यांची मोट आवळली जाणार असून हे सर्व संबंधितजण तिसऱ्या आघाडीच्या झेंड्याखाली एकत्र येणार असल्याची माहिती पुढं आली आहे.

आमदार राम सातपुतेंचा गटदेखील आघाडीत

● आमदार राम सातपुते यांना मानणारा त्यांच्या खास समर्थकांचा मोठा गट या तालुक्यात आहे. मोहिते-पाटील आणि जानकर हे एकत्र आल्यानं शिवाय त्यांनी आमदार राम सातपुते यांच्याविरोद्धात कडवी भूमिका घेतल्यानं सातपुते समर्थक गट तिसऱ्या आघाडीसोबत असणार आहे.

नाईक-निंबाळकर, सातपुतेंचे आघाडीला पाठबळ

● माळशिरस तालुक्यात मोहिते-पाटील आणि जानकर यांना आव्हान देणारी तिसरी आघाडी स्थापन करण्यापासून ते ही आघाडी अधिक भक्कम होऊन ती कायम टिकण्यासाठी खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर आणि आमदार राम सातपुते यांचे पाठबळ या आघाडीला असणार आहे. या दोघा संबंधितांच्या नेतृत्वाखाली जानकर आणि मोहिते-पाटील यांचं नेतृत्व मान्य न करणाऱ्यांना एकत्रीत केलं जाऊ शकतं.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची ऊर्जा

● मोहिते-पाटील आणि जानकर यांच्यासह त्यांच्या समर्थकांचे गट भाजपविरोधात गेले आहेत. ऐन लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर हे संबंधितजण हा पक्ष सोडून गेले आहेत. भाजपच्या विरोधात बंडाचे निशाण त्यांनी फडकावलं आहे. याबद्दलची मोठी खदखद उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मनामध्ये आहे. जानकर आणि मोहिते-पाटील यांच्या विरोधात आमदार राम सातपुते आणि खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली जर माळशिरस तालुक्यात तिसऱ्या आघाडीचा उदय होत असेल त्याला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून ऊर्जा मिळेल, असा विश्वास तिसरी आघाडी स्थापन करण्यासाठी प्रयत्नशील असणाऱ्यांना वाटतो आहे.